वर्ष-०८ | अंक-२४ | मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ मे - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

PG 2

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

मुंबईच्या सुरक्षेसाठी 50 वर्षांचे नियोजन हवे

3 → तरुणाच्या हत्येचा उलगडा; मोबाइलवर बोलण्याच्या वादातून मित्रानेच डोक्यात दगड टाकून हत्या केल्याचे उघडकीस

उद्योजक व्हा, रोजगार वाढवा- महाराष्ट्रदिनी केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणेंचे आवाहन ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## व्हाट्सऍपवर मैत्री करून कथित पत्रकाराचा महिलेवर बलत्कार; गुन्हा दाखल




ठाणे - एका कथित पत्रकारने त्याच्याच व्हाट्सऍप ग्रुपवर असेलेल्या 37 वर्षीय महिलेशी मैत्री करत लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना घडली आहे. शिवाय पीडितेची आर्थिक फसवणूकही केली. हा प्रकार उल्हासनगरमध्ये उघडकीस आला आहे. खळबळजनक बाब म्हणजे पीडिता कथित पत्रकाराच्या अत्याचारामुळे गर्भवती असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात कथित पत्रकारावर बलत्कारसह फसवणुकीचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. शिवकुमार मिश्रा, असे गुन्हा दाखल झालेल्या कथित पत्रकाराचे नाव आहे. देव दर्शनाच्या बहाण्याने पीडितेवर अत्याचार - पीडित महिला उल्हासनगरमधील एका खासगी फायनान्स कंपनीत कार्यरत आहे. 2016 सालपासून आरोपीच्या व्हाट्सऍप ग्रुपवर असल्याने दोघांची ओळख झाली. त्यातच 2018 साली एका सामाजिक कामाच्या निमित्ताने भेट झाली. या भेटीनंतर आणखीच ओळख वाढल्याने दोघांत मैत्री झाल्याने सतत मोबाईलवर बोलणे सुरू होते. त्यानंतर ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर ऑगस्ट, 2018 ला देव दर्शनाच्या बहाण्याने पीडितेला कार मध्ये नेऊन टिटवाळा परिसरात तिच्या इच्छे विरुद्ध बळजबरीने अत्याचार केला.आरोपीवर खंडणीचा गुन्हा दाखल - काही महिन्यानंतर दोघामध्ये वाद होऊन भांडण झाल्याने पीडितेने आरोपीचा मोबाईल नंबर ब्लॉक केला. मात्र, त्यानंतर आरोपीने ...पान २ वर...

# झटपट श्रीमंत होण्यासाठी इडली विक्रेता झाला तस्कर

## पाच कोटींच्या अंबरग्रीससह अटक



झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग इडली विक्रेत्याला थेट तुरुंगात घेऊन गेला. मुंबई पोलिसांनी अंबरग्रीससह एका इडली विक्रेत्याला अटक केली. आरे कॉलनीतील रॉयल पाम विभागात अंबरग्रीस विकण्यासाठी आणले होते. जप्त करण्यात आलेल्या अंबरग्रीसची किंमत 5 कोटींच्या घरात आहे. आरोपी हा वसई येथे राहणारा असून इडली विक्रेता आहे. अंबरग्रीसची विक्री झाल्यानंतर आरोपीला कमिशन म्हणून 50 लाख रुपये मिळणार होते.

पोलिसांनी आरे कॉलनीतून अटक केलेल्या आरोपीचे नाव शेडू रामन श्रीनिवासन आहे. आरोपी वसईतच इडली सांभार विक्रीचे काम करत होता. अंबरग्रीसची विक्री केल्यास कमिशन म्हणून लाखो रुपये मिळतील असे त्याला एकाने सांगितले होते. झटपट श्रीमंत होण्यासाठी त्याने ओळखीतील एका व्यक्तीकडे अंबरग्रीसची मागणी केली. हे अंबरग्रीस घेऊन तो आरे कॉलनीत विक्रीसाठी आला होता. अंबरग्रीसची बेकायदेशीर खरेदी-विक्री होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी आरे कॉलनीत सापळा रचला. रॉयल पाम भागात 27 एप्रिल रोजी आरोपी शेडू दुपारच्या सुमारास आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून 2 किलो अंबरग्रीस जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात अंबरग्रीसची किंमत 5 कोटी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपी शेडूला अंबरग्रीसचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

### अंबरग्रीस म्हणजे काय?

समुद्रात व्हेल माशांनी केलेल्या उलटीमधून अंबरग्रीस हा पदार्थ बाहेर पडतो. या अंबरग्रीसचा वापर महागडे परफ्यूम, सौंदर्य प्रसाधने आणि महागडी औषधे बनवण्यासाठी केला जातो. आपल्या देशात आणि परदेशात त्याची विक्री आणि खरेदी करणे बेकायदेशीर कृत्य समजले जाते. मात्र, त्यानंतरही लाखो रुपयांच्या लोभापायी काहीजण याची तस्करी आणि विक्री करतात.

## सावधान; सोशल मीडियावर अश्लिल फोटो, व्हिडिओ शेअर केल्यास घडू शकते जेलवारी



नाशिक - सोशल मीडियाचा वापर करताना अश्लिल व्हिडिओ, फोटो चुकूनही शेअर झाले, तर हा गंभीर गुन्हा ठरू शकतो. यात संबंधित व्यक्तीला जेलवारी ही होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर करताना काळजी घेणे गरजेचे आहे. सायबर पोलीस अशा व्हिडिओ, फोटो शेअर करणाऱ्यांवर नजर ठेऊन आहेत. सायबर पोलिसांची आहे नजर . . . - सध्या मोबाईल मुळे जग जवळ आले आहे. अशात सोशल मीडियाचा वापर वाढला आहे. अशात आता नकळतपणे काही चूकही गंभीर गुन्हा ठरणार आहे. अश्लिल फोटो व्हिडिओ जर तुम्ही कोणाला पाठवत असाल, तर त्यात तुम्हाला कायद्याने तुरुंगवास होऊ शकतो. अश्लिल व्हिडिओ, फोटोची देवाणघेवाण सोशल मीडियाच्या कुठलाही साईटद्वारे जर करण्याचा प्रयत्न केला, तर हा गंभीर गुन्हा होतो. याचे भान ठेवणे गरजेचे असल्याचे सायबर पोलिसांनी सांगितले आहे.मुले स्मार्ट फोनवर काय बघतात . . - कोरोनामुळे अनेक मुलांना शाळेने ऑनलाईन शिक्षण दिले. त्यामुळे पालकांनीही मुलांच्या हाती मोबाईल दिले. मात्र लहान वयात मुलांच्या हाती आलेल्या स्मार्ट फोनमुळे त्याच्या मनावर काय परिणाम होतील, याचा विचार अनेक पालक करत नाहीत. अशात मुलांकडून स्मार्ट फोनवर कुतूहलापोटी नेमके काय बघितले जाते, याचा विचार पालकांनी करायला हवा, असे सायबर पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## 1 जूनपासून मुंबईतील वृत्तपत्रे महागणार; वृत्तपत्र विक्रेता संघटनेचा निर्णय



वृत्तपत्र तयार करण्यासाठी लागणाऱ्या कागदांच्या किमती वाढल्याने आता वृत्तपत्र विक्रेता संघटनेने मोठा निर्णय घेतला आहे. ऑनलाईन वृत्तपत्रांमुळे आधीच डबगाईला आलेला वृत्तपत्र व्यवसाय कोरोना महामारीमुळे मोठ्या आर्थिक संकटात सापडला. या पार्श्वभूमीवर आता 1 जूनपासून मुंबईतील सर्व भाषिक वृत्तपत्रांच्या किमती वाढवण्याचा निर्यण घेण्यात आला आहे. शिवसेना नेते, राज्याचे उद्योगमंत्री आणि वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष सुभाष देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

नुकतील सुभाष देसाई यांच्या शिवनेरी या शासकीय निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीत मुंबईतील विक्रेता संघटनेचे प्रतिनिधी, वृत्तपत्र व्यवस्थापनेचे प्रमुख अधिकारी, युनायटेड पहम ऑफ न्यूजपेपर मुंबईचे अध्यक्ष बाजीराव दांगट आदी उपस्थित होते. यावेळी वृत्तपत्र व्यवसाय आणि विक्रीदरम्यान भेडसवणाऱ्या अनेक समस्यांवर चर्चा करण्यात आली.वृत्तपत्र व्यवसाय टिकावा तसेच या व्यवसायातील अडचणी दूर करण्यासाठी सुभाष देसाई यांनी मार्गदर्शन केले.

### रेल्वे – मेट्रो स्थानकावरील स्टॉल्ससंदर्भात रेल्वे मंत्र्यांची चर्चा

मुंबईतील रेल्वे स्थानकांवर असणाऱ्या व्हीलर स्टॉल्सवर तसेच मेट्रो रेल्वे स्थानकांवर वृत्तपत्रे मिळत नसल्याची तक्रार अनेक प्रवासी वाचकांकडून येत असतात. दरम्यान रेल्वे आणि मेट्रो स्थानकांवरील स्टॉल्स स्थानिक वृत्तपत्र विक्रेत्यांना चालवण्यासाठी द्यावे जेणेकरून यातून अनेकांना रोजगार मिळेले. यासाठी सुभाष देसाई लवकरचं केंद्रीय रेल्वेमंत्री आणि एमएमआरडीसोबत चर्चा करणार असल्याचे म्हणाले आहेत.


## शॉर्ट कटने घात केला; म्हैस शोधण्यासाठी गेलेल्या तिघी मायलेकींचा तलावात बुडून मृत्यू



अकोला - म्हैस शोधण्यासाठी गेलेल्या तिघी मायलेकींचा तलावात बुडून मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना बार्शीटाकळी तालुक्यातील दगडपारवा या गावात सोमवारी सकाळी उघडकीस आली. सारिका सुरेश घोगरे (वय 42 वर्षे), वैशाली सुरेश घोगरे (वय 16 वर्ष) अंजली सुरेश घोगरे (वय 14 वर्ष) असे तलावात बुडालेल्या मायलेकींची नावे आहेत.

हरवलेली म्हैस शोधायला गेल्या होत्या मायलेकी - दगडपारवा येथील सारिका सुरेश घोगरे यांची म्हैस रविवारी हरवली होती. त्यामुळे गावाशेजारील परिसरात या तिघी मायलेकी म्हशीचा शोध घेत होत्या. आपली म्हैस तलावाशेजारील शेतात असल्याची माहिती त्यांना समजली होती. त्यामुळे त्या तिघी मायलेकी म्हशीला आणण्यासाठी तलावाकडे म्हशीचा शोध घेत होत्या.शॉर्टकटने घात केला, अन् तिघीजणी बुडाल्या - दगडपारवा गावातील तालावाच्या शेजारील शेतात म्हैस असल्याची माहिती मिळाल्यामुळे सारीका, वैशाली आणि अंजली या तलावा शेजारुन जात होत्या. मात्र तलावाला वळसा घालून गेल्यापेक्षा कालव्यातून पलिकडे जाऊ, असा विचार त्यांनी केला. त्यामुळे तिघीही मायलेकी कालवा ओलांडून पलिकडे जात होत्या. सुरुवातीला आई सारीका यांनी पाण्यातून रस्ता काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्या पाण्यात बुडत होत्या. हे पाहून त्यांची मोठी मुलगी वैशालीने आईला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, ती पण पाण्यात बुडत असल्याचे पाहून लहान मुलगी अंजलीने या दोघींना वाचवण्यासाठी त्यांच्याकडे धाव घेतली. परंतु, तीही या पाण्यात बुडाली. या तिघांचाही शोध रविवारी दुपारपासून सुरू होता. मात्र, त्या मिळाल्या नाही.

शोध घेऊनही सापडले नाहीत मृतदेह - म्हैस शोधम्यासाठी तलावात बुडालेल्या तिघी मायलेकींचा शोध रविवारी दुपारपासून सुरू होता. मात्र त्यांचे मृतदेह शोधूनही सापडले नाहीत. सोमवारीही मृतदेहाची शोधाशोध सुरू करण्यात आली. त्यावेळी तलावांमध्ये या तिघांचेही मृतदेह पाण्यावर तरंगताना ग्रामस्थांना आढळून आले. त्यामुळे तिघींचेही मृतदेह ग्रामस्थांनी बाहेर काढले. या घटनेची माहिती बार्शिटाकळी पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. या घटनेमुळे गावात मात्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ मे - २०२२

# भयंकर घटना! पेट्रोल ओतून महिलेला जाळले, लायटर पेटवताच आरोपीही होरपळला; कारण होतं...



पुणे : कामावरून काढून टाकल्याच्या रागातून कामगाराने लेडिज टेलरींगचे दुकान चालवणाऱ्या महिलेला पेट्रोल ओतून लायटरने पेटवून दिल्याची घटना सोमवारी रात्री ११ वाजता घडली. या घटनेत दुकान चालवणारी महिला गंभीर जखमी झाली होती. महिलेला जाळण्याचा प्रयत्न करत असताना आरोपी देखील होरपळल्याने गंभीर जखमी झाला होता. रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मध्यरात्री मृत्यू झाला. महिलेचा आज सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास मृत्यू झाला. महिलेला वाचवण्यासाठी मदतीला धावलेला आरोपीचा मित्र देखील गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी चंदननगर पोलिसांनी आरोपीवर खुनाचा प्रयत्न केल्याचा (३०२ ) गुन्हा दाखल केला आहे.

एटी टू झेड लेडिज टेलरींगचे दुकान चालवणाऱ्या बाला नोया जॉर्नी (वय ३२) या महिलेला जाळण्याचा प्रयत्न आरोपीने केला. ही महिला मूळची ओरिसाची आहे आणि वडगाव शेरी येथे राहत होती. दुकानात काम करणारा कामगार मिलिंद गोविंदराव नाथसागर (वय ३५) याने पेट्रोल ओतून या महिलेला जाळण्याचा प्रयत्न केला. कामावरून काढून टाकल्याच्या रागातून आरोपी कामगाराने महिलेवर पेट्रोल ओतल्याचे समोर आले आहे. यात महिला ९० टक्के भाजली होती. आरोपीच्या मृत्युंनतर तिचाही आज मृत्यू झाला. पुण्यातील वडगाव शेरीमध्ये नगर रस्तात्यावर सोमनाथ नगरमध्ये रामचंद्र सभागृहशेजारी ही घटना घडली. टेलरींगच्या दुकानाला आग लागल्याची माहिती सुरवातीला होती. या अग्निशमन दलाचे वाहन पोहोचण्याआधीच स्थानिकांनी आग नियंत्रणात आणली. याघटनेत ३ जण होरपळले होते. यात जखमी २ पुरूष आणि एका महिलेला रुग्णालयात दाखल केले गेले होते. यात पुरुषाचा रात्रीच मृत्यू झाला, अशी प्राथमिक माहिती मिळाली होती.

# मुंबईच्या सुरक्षेसाठी 50 वर्षांचे नियोजन हवे

मुंबईचे वादळवारा, अतिवृष्टी, पूरस्थिती, ग्लोबल वॉर्मिंगपासून संरक्षण करण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली एकाच प्राधिकरणामार्फत पुढील ५० वर्षांचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरण व पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले. मुंबईतील पूर जोखीम व व्यवस्थापनावर विचारमंथन करण्यासाठी मुंबई महापालिका व वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट इंडिया या संस्थेच्या सहकार्याने सह्याद्री अतिथीगृह येथील सभागृहात २८ व २९ एप्रिल रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा शुभारंभ आदित्य ठाकरे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. मुंबईत एकीकडे झपाट्याने विकासकामे होत आहेत. मातीची मैदाने कमी होऊन उंच इमारती, सिमेंटचे रस्ते वाढत आहेत. त्यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही. वाढत्या शहरीकरणात १९८० पासून ते आजपर्यंत मुंबईतील हरित पट्टे कमी झाले आहेत. मार्च, एप्रिल महिन्यात कडाक्याची उष्णता जाणवते. गेल्या दोन-तीन वर्षांत मुंबईत वादळे धडकली. फेब्रुवारी महिन्यात कडाक्याची थंडी पडून स्वेटर घालावे लागले होते. हवामान खात्याकडून पुढील तीन तासांचे अंदाज येतात, मात्र पुढील तीन दिवसांचे अंदाज येत नाहीत, अशी



खंत आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली. अशा परिस्थितीत मुंबईच्या सुरक्षिततेबाबत विचारमंथन करणे, उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. यावर मुंबई महापालिका सर्वतोपरी उपाययोजना करीत आहे, मात्र मुंबईत एखादा रस्ता बनवायचा असेल तर जमिनीखालील ४३ युटिलिटी हटविणे व त्यासाठी त्यांची परवानगी घ्यावी लागते. मुंबईत म्हाडा, एमएमआरडीए, रेल्वे अशी १६ विविध प्राधिकरणे असून त्यांच्यात समन्वयाचा अभाव जाणवतो. त्यामुळे मुंबईच्या सुरक्षिततेसाठी एकच प्राधिकरण असणे आणि किमान पाच वर्षांसाठी नव्हे, तर पुढील ५० वर्षांसाठी ठोस व खास नियोजन करणे आवश्यक आहे, असे मत मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले. पहिल्या दिवशी पार पडलेल्या सत्रात प्रारंभी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू यांनी, मुंबईतील भौगोलिक स्थिती, हवामान, पावसाचे प्रमाण, पर्जन्य जलवाहिन्यांची क्षमता, पावसाळ्यात पाणी साचणारी ३८६ ठिकाणे, पूरस्थिती रोखण्यासाठी पालिकेने आतापर्यंत केलेल्या विविध उपाययोजना, हिंदमाता, मिलन सब वे, किंग्जसर्कल आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात साचणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी 6 ठिकाणी उभारलेले मोठे पंपिग स्टेशन, मोगरा व माहुल या ठिकाणी आणखीन दोन पंपिंग स्टेशन प्रस्तावित असणे, मिनी पंपिंग स्टेशन उभारणी, तांत्रिक अडचणी, नद्या, नाले या ठिकाणी असलेली अतिक्रमणे व यासर्वांवरील उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली.

# धक्कादायक! डॉक्टरने केली पत्नीची हत्या; पोलीस तपासात धागेदोरे मिळताच...





अमरावती : शहरातील राधानगरातील डॉ. पंकज दिवाण यांची पत्नी प्रियंकाचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. २० एप्रिलला सकाळी ही घटना घडली होती. तिची हत्या झाली की आत्महत्या केली? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. या प्रकरणी तपासात पोलिसांच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे लागले. ज्यात अनेक बाबी उघड झाल्याने पोलिसांनी डॉक्टरसह त्याची आई व बहिणीवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. प्रियंकाच्या माहेरच्या नातेवाइकांनी मृत्यूबाबत संशय व्यक्त केला होता. यानंतर प्रियंकाच्या मृतदेहाचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदन करण्यात आले. प्रियंकाच्या डोक्यात अंतर्गत जखमा व रक्तस्त्राव तसेच श्वास गुदमरून मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले. यानंतर गाडगेनगर पोलिसांनी बुधवारी रात्री डॉ. पंकज दिवाण, त्याची आई व बहिणी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात मृत प्रियंकाची बहीण प्रगती रमेश कातकीडे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राधानगरमध्ये आहे डॉ. पंकज दिवाणचे घरवजा रुग्णालय प्रियंकाच्या मृतदेहापासून काही अंतरावरच एक फुटलेले ॲम्पुल व चार ते पाच सिरींज सापडल्या होत्या. यातील ॲम्पुलमध्ये तसेच काही सिरींजमध्येही औषध होते. याचा वापर प्रियंकाच्या शरीरावर झाला का? झाला असल्यास तो कोणी केला, ते औषध कशासाठी वापरले जाते. तिच्या हाताला इन्ट्रॉकॅथ कोणी लावली, या सर्व प्रश्नांची उत्तरं अजून गुलदस्त्यात आहेत. सिरींज व ॲम्पूलचा फॉरेन्सिककडून अहवाल आल्यानंतर इंजेक्शन व सिरींजचा या प्रकरणातील समावेश समोर येणार आहे. लग्नानंतर दोन ते तीन महिने तिला चांगले वागवले. त्यानंतर मात्र प्रियंकाला लहान सहान गोष्टीवरुन त्रास देत होते. तसेच डॉ. पंकजची आई व बहीणही छळत होते. दरम्यान २२ फेब्रुवारी २०२२ ला प्रियंका या माहेरी आल्या होत्या. डॉ. पंकजच्या सांगण्यानुसार साडेतीन लाख रुपये वडिलांकडे मागितले होते. त्यावेळी प्रियंकांच्या वडिलांनी तीन लाखांचा चेक दिला होता. डॉ. पंकज त्यांना त्रास देता होता. डॉ. पंकजला पहिल्या पत्नीला पुन्हा घरात आणायचे होते.

पृष्ठ १ वरुन

## व्हाट्सएॅपवर मैत्री करून

पीडितेची माफी मागून पुन्हा, असे भांडण होणार नाही आपण लवकरच लग्न करू असे पुन्हा आमिष दाखवले. त्यामुळे पीडितेने त्याकडे लग्नाचा तगादा लावल्याने त्याने पीडितेला जून, 2019 मध्ये उल्हासनगरमध्येच एक खोली भाड्याने राहण्यास देऊन तोही तिच्यासोबत राहत होता. दरम्यानच्या काळात दोघेही सोबत राहत असतानाच सप्टेंबर, 2019 साली पीडितेच्या नावाने खासगी फायनान्समधून कर्ज काढून 1 लाख 60 हजार आरोपीने घेतले. त्यातच 2020 साली आरोपीवर एका प्रकरणात खंडणीचा गुन्हा दाखल झाल्याने तो फरार झाला होता. त्याचवेळी आरोपीला पत्नी व दोन मुले असल्याचे पीडितेला समजले होते. तर पीडितेला पैशाची गरज असल्याने तिने त्याला पैसे मागितले असता आता माझ्या असलेल्या खंडणी प्रकरणात सर्व पैसे खर्च झाले असून लवकरच आपण लग्न करू, मात्र आदी माझ्या पहिल्या पत्नीला घटस्फोट देतो, असे बोलून तिची समजूत काढली.

पोटातील बाळ माझे नाही, असे बोलून घरातून दिले हाकलून - दरम्यानच्या काळात म्हणजे सप्टेंबर, 2020 साली पुन्हा दुसरीकडे पीडितेला खोली भाड्याने घेऊन दिली. तर ऑक्टोबर, 2020 रोजी पीडिता गर्भवती राहिल्याने आरोपीने स्वतःचे खरेदी केलेल्या घरात पीडितेला ठेवून दोघेही सोबत राहत होते. या दरम्यान 20 फेब्रुवारी, 2020 ला आरोपी दारू पिऊन घरी आला आणि भांडण करत पिडीतेला अश्लील शिवीगाळ करत तुझ्या पोटातील बाळ माझे नाही, असे बोलून तिला घरातून हाकलून दिले. अशाच परिस्थितीत पीडिता तिच्या बहिणीच्या घरी राहण्यास गेली.व्हाट्सएॅप स्टेटेस पीडितेची बदनामी - त्यानंतर 27 एप्रिल, 2022 रोजी आरोपीचे व्हाट्सएॅप स्टेटेस पीडितेने व तिच्या बहिणीने पहिले असता त्यावर पीडितेच्या नावाने अश्लील भाषेतील मजकूर टाईप करून तिचे अश्लील फोटो अपलोड करून तिची बदनामी केल्याचे आढळून आले. या घटनेनंतर पीडितेने 30 एप्रिल, 2022 रोजी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात धाव घेत तिच्यावर मे, 2018 ते 27 एप्रिल, 2022 पर्यंत घडलेल्या प्रसंगाचे कथन करताच पोलिसांनी कथित पत्रकार शिवकुमार मिश्रा विरोधात भा.दं.वी.चे कलम 376, 420, 406, 500, 323 व 67 प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# सख्या बहिणीने केला भावाचा खून, 'मला भावाला मारायचे नव्हते, पण...'



मनमाड : बहीण भावाचे नाते प्रेमाचे आणि आपुलकीचे. मात्र या नात्याला काळिमा फासणारी घटना मंगळवारी मनमाड शहरात घडली. माहेरी आलेल्या विवाहित बहिणीने दारूच्या नशेत शिवीगाळ करणाऱ्या भावाला चाकूने भोसकले. यात भावाचा जागीच मृत्यू झाला. शहरातील विवेकानंद नगर भागात ही भयाना घडना घडली. घटनेनंतर बहीण स्वतःहून पोलिस ठाण्यात जाऊन घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. पोलिसांनी तिला अटक केली आहे. संदीप उर्फ बाळू गोंगे असे मतृ भावाचे नाव आहे.

विवेकानंद नगरात संदीपच्या घरी श्रीरामपूर येथून विवाहित बहीण शोभा गारुडकर काही दिवस राहायला आली होती. मात्र बाळू सतत दारूच्या नशेत असायचा व कायम शिवीगाळ करत असे. मंगळवारीही तो दारू पिऊन आला आणि बहिणीला शिवीगाळ केली. त्यामुळे संतापलेल्या शोभाने स्वयंपाक घरातील चाकू बाळूच्या पोटात भोसकला. रक्तस्राव जास्त झाल्याने बाळूचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर शोभा पोलिसात हजर झाली. 'मला भावाला मारायचे नव्हते, पण तो मेला हो' असे बहीण पोलिसांना सांगत होती. भाऊ गेला, वडील नाहीत. आता आईकडे कोण पाहणार, अशा शब्दात शोभा पोलिसांपुढे गयावया करीत होती.

# आईला वाचविणाऱ्या मुलाचा पित्याकडून खून; कोर्टाने दिली 'ही' शिक्षा



अहमदनगर: होळीच्या दिवशी दारू पिऊन घरी आलेल्या पतीला पत्नीने जाब विचारला. त्यामुळे संतापलेला पती तिच्या अंगावर धावून गेला. मात्र त्यांचा तरुण मुलगा मध्ये पडला आणि ते भांडण तेथे मिटले. परंतु हा राग डोक्यात ठेवून घराबाहेर पडलेल्या पित्याने त्याच रात्री आपल्या मुलाचा खून केला. गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यात शेवगाव तालुक्यातील आखेगाव येथे ही घटना होती. या खटल्यात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी पिता गोरख उर्फ गोरक्षनाथ किसन कर्पे (वय ४५ रा. आखेगाव, ता. शेवगाव) याला गुरूवारी जन्मठेपेची शिक्षा दिली. या प्रकरणात मृत मुलगा सोमनाथ (वय १८) याच्या आईने फिर्याद दिली आहे. गेल्यावर्षी २९ मार्चला आरोपी गोरख कर्पे दारू पिऊन घरी आला होता. त्यामुळे आज होळीचा सण असुन तुम्ही सणासुदीच्या दिवशी दारू का पिवुन आला? अशी विचारणा त्याला पत्नीने केली. याचा राग येऊन आरोपी तिला मारण्यासाठी अंगावर धावून गेला. त्यावेळी त्यांचा मुलगा सोमनाथ तेथेच होता. तो मध्ये पडला. त्यावर आरोपीने मुलालाही शिवीगाळ केली आणि निघून गेला. त्या रात्री मुलगा सोमनाथ आणि त्याची आई शेतात ऊसाला पाणी देण्यासाठी गेले. पहाटेपर्यंत त्यांचे पाणी भरण्याचे काम सुरू होते. सोमनाथ वरच्या बाजून पाणी सोडत होता, तर आई शेवटच्या टोकाला थांबून पाणी पोहचले का ते सोमनाथला सांगत होती. त्यांचे हे काम सुरू असताना पहाटे साडेतीनच्या सुमारास सोमनाथ याचा ओरडल्याचा आवाज आला. त्यामुळे काय झाले, हे पाहण्यासाठी त्याची आई तेथे धावत आली. त्यावेळी आरोपी गोरख कर्पे त्याला लोखंडी गजाने मारत होता आणि मुलगा बेशुद्ध होऊन बांधावर पडला होता. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेला. आईने शेजाऱ्यांच्या मदतीने मुलाला रुग्णालयात नेले. मात्र, गंभीर जखमी झाल्याने त्याचा उपचार घेताना मृत्यू झाला.

# धक्कादायक! जावयाने सासऱ्याची धारदार शस्त्राने केली हत्या



पत्नीला घरी घेऊन जाण्यासाठी पती सासुरवाडीत गेला होता. त्यावेळी सासरे आणि जावयामध्ये भांडण झाले. रागाच्या भरात जावयाने सासऱ्यावर धारधार शस्त्राने हल्ला केला. यामध्ये सासऱ्याचा मृत्यू झाला आहे. अकोल्यातील तेल्हारा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम पाथर्डी येथे ही धक्कादायक घटना घडली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध घेत आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पाथर्डी येथील मृतक गजानन पवार वय 55 वर्ष यांच्या मुलीचा काही वर्षांपूर्वी उमरी येथे झाला होता. गेल्या चार महिन्यापासून मुलगी माहेरी आलेली होती. काल दिनांक 23 एप्रिल रोजी आरोपी जावाई निलेश विठ्ठल धुरंदर वय 35 वर्षीय (रा उमरी ता तेल्हारा) हा आपल्या पत्नीला घेऊन जायला चार वाजेच्या दरम्यान गेला. मात्र वडील घरी नाहीत, त्यांना येउ द्या नंतर बघू असे म्हणत पत्नीने जाण्यास नकार दिला. काही वेळाने मुलीचे वडील घरी आले. त्यावेळी जावयाने त्यांच्यासोबत वाद घालुन तेथून निघून गेला. त्यानंतर रात्री अंगणामध्ये मृतक गजानन पवार हे घराच्या अंगणामध्ये खाटेवर झोपलेले असताना आरोपी मध्यरात्री 3.30 वाजेच्या दरम्यान सासरा झोपला असताना मानेवर धारदार चाकूने वार केले. यामध्ये ते रक्तबंबाळ झाले. जावई हल्ला करत असताना मृतक गजानन पवार यांनी अरडाओरड केली. त्यानंतर मृतकाची मुलगी धावत बाहेर आली असता तिचा पती हातामध्ये चाकू घेऊन उभा होता. यावेळी पुन्हा वार करणार तोच मृतकाच्या मुलीने आरोपी पतीला ढकलून आरडाओरड केली. तेव्हा आरोपी तेथून पसार झाला. ही बातमी ही पसरली मृतक गजानन पवार यांना वाचवण्याचे प्रयत्न केले. मात्र दवाखान्यात नेण्याअगोदर त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल होऊन आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळे पथक तयार करून जवळपास दोन तास शोध घेतला. खाकटा या गावानजीक आरोपी पोलिसांना गवसला. यावेळी आरोपी जावयाला अटक करून आरोपीच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून तेल्हारा पोलीस ठाण्यात कलम 302,506 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चोरट्यांनी चक्क जेसीबीने फोडले एटीएम, सांगली जिल्ह्यातील मिरजमधील घटना




सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यामधील आरग गावात चोरट्यांनी चक्क जेसीबीने एटीएम फोडले आहे. परंतु, या एटीएम मधील 27 लाख रूपयांची रक्कम चोरट्यांना चोरता आली नाही. आरग गावात शनिवारी मध्यरात्री ही घटना घडली आहे.

मिरज तालुक्यातील आरग गावात ॲक्सिस बँकेचे एटीएम आहे. या एटीएमजवळ सुरक्षा रक्षक नसल्याचे पाहून चोरट्यांनी जेसीबीने एटीएम फोडण्याचे धाडस दाखवले आहे. चोरट्यांनी फोडलेल्या एटीएममध्ये 27 लाखांची रोख रक्कम होती. जेसीबीने चोरट्यांनी एटीएम फोडलं असलं तरी त्यातील 27 लाख रूपयांची रक्कम चोरट्यांच्या हाती लागली नाही.

एटीएम फोडत असल्याचा आवाज येऊ लागल्यामुळे स्थानिकांना या घटनेचा संशय आला. याची कुणकुण चोरांना लागल्यामुळे चोरटे रक्कम न घेताच पसार झाले. शनिवारी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास एका पेट्रोल पंपावर उभा करण्यात आलेले जेसीबी चोरट्यांनी चोरी करून एटीएम फोडले. जेसीबीने एटीएम मशीन उचलून बाहेर घेतले आणि त्याचे तीन तुकडे केले.

धक्कादायक बाब म्हणजे या चोरीसाठी गावातीलच एका व्यक्तीचे जेसीबी वापरले असून ते चोरून आणले होते का? याबाबत पोलीस तपास करत आहेत. पोलिसांना आरग गावाजवळीलच एका रस्त्यावर चोरीतील जेसीबी मिळाले असून पोलिसांनी ते ताब्यात घेतले आहे.

# फेसबुकवरील फ्रेंडशिप महागात! पोलीस शिपायाचा विवाहित इंजीनियर महिलेवर अत्याचार, पोलिसांनी ठोकल्या बेड्या




पुण्यातील पोलीस शिपायाने विवाहित इंजिनिअर महिलेवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नग्न फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत त्याने हे कृत्य केल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे. याप्रकरणी विक्रम फडतरे या पोलीस शिपायाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पीडितेने भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये तसा गुन्हा दाखल केला आहे. 34 वर्षीय विक्रम सध्या पुणे पोलिसांच्या वाहतूक विभागात कार्यरत आहे. विक्रमने पीडितेला सप्टेंबर 2021मध्ये फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. विक्रमच्या फेसबुकबर काही ओळखीचे मित्र पीडितेला दिसले, म्हणून ती रिक्वेस्ट त्यांनी स्वीकारली. दोघांमध्ये ऑनलाईन गप्पा सुरु झाल्या. दोघे ही विवाहित असल्याने चर्चा मैत्रीपर्यंतच मर्यादित होते. मैत्री-मैत्रीत विक्रमने भेटण्याचं ठरवलं. सुशिक्षित आणि इंजिनिअर पीडिता आयटी कंपनीत नोकरीला असल्याने आणि विक्रम पोलीस असल्याने भेटण्यात गैर नसल्याचं तिला वाटलं.



## संपादकीय...

# बंधुत्व सदा विराजो...

प्रखर लढा देऊन मराठी माणसाने ‘संयुक्त महाराष्ट्र’ हे मराठी भाषकांचे स्वतंत्र राज्य मिळवले, त्यास आज सहा दशके उलटली आणि उद्याच्या रविवारी या राज्याचा आणखी एक ‘वर्धापन दिन’ हाच मराठी माणूस उत्साहाने साजरा करणार आहे. मात्र, आजमितीला रूढार्थाने ‘ज्येष्ठ’ या पदवीला पोचलेल्या या राज्याची प्रकृती नेमकी कशी आहे? एक मे १९६० रोजी राज्याची विधिवत स्थापना झाली. तेव्हापासून हे राज्य देशातील प्रगत आणि सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक क्षेत्रांतील आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाते. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी ‘ज्ञानेश्वरी’ हा ग्रंथ लिहिला आणि त्यानंतर लोकांना मराठी भाषा तसेच संस्कृती यांचे भान येऊ लागले. मात्र, त्यापूर्वीपासूनच म्हणजे पाचव्या-सहाव्या शतकापासून ‘महाराष्ट्र’ असा गौरवपूर्ण उल्लेख प्राचीन संस्कृत तसेच प्राकृत वाङ्मयात आढळत असल्याचे दाखले, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील ज्येष्ठ नेते आणि साहित्यकार आचार्य अत्रे यांनी दिले आहेत. मात्र, या संपूर्ण प्रवासात महाराष्ट्राच्या अस्मितेवर आघात करण्याचे प्रयत्न काही कमी झाले नाहीत. मात्र, कष्टकरी तसेच विचारी मराठी माणसाने या सगळ्या आव्हानांना उत्तर दिले. आजही हे राज्य देशात अनेक क्षेत्रांत आघाडीवर असताना त्याची प्रगती कशी खुंटली, ते दाखवण्याचे प्रयत्न होताहेत. काही प्रमाणात तरी आजचे वर्तमान अस्वस्थ आहे. मराठी माणसाच्या मनात संभ्रम निर्माण करून, दुहीचे तसेच द्वेषाचे वातावरण तयार करण्याचे प्रयत्न होत आहेत. मराठी माणसाला त्याविरोधात खंबीरपणे पुन्हा उभे राहावे लागणार आहे.

महाराष्ट्राचे वर्तमान सध्या अशा विविध कारणांनी अस्वस्थ आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या भावनिक तणावात चुकून जरी कोठे ठिणगी पडली, तर ती सदैव प्रगतिपथावर राहणाऱ्या महाराष्ट्राला मागे खेचल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे राज्यातील साहित्यिक, कलावंत तसेच विचारी लोकांनी याच महाराष्ट्र दिनानिमित्ताने राज्यातील विविध जाती-धर्मांमधील तेढ वाढू नये, यासाठी शांततापूर्ण निर्दशनांचा कार्यक्रम राज्यभर आयोजित केला आहे. अशी तेढ गेल्या काही वर्षांत केवळ महाराष्ट्र देशीच नव्हे, तर देशभरातच वाढत आहे. त्यामुळे शंभराहून अधिक निवृत्त सनदी अधिकाऱ्यांनी पंतप्रधानांना यासंदर्भात देशवासीयांना काही मोलाचे चार शब्द सांगण्याचे केलेले आवाहन हेही देशातील अस्वस्थ प्रकृतीला सर्वसमावेशक अशा चार मात्रा देणारेच आहे. या सध्याच्या परिस्थितीत राज्याच्या विविधांगी कामगिरीचा आलेख उंचावत ठेवण्याचे आव्हान आहे. औद्योगिक क्षेत्रातली आपली मुसंडी कौतुकाची असली तरी स्पर्धात्मकता वाढत आहे, हेही लक्षात घ्यावे लागते. इतर राज्येही उद्योगपूरक धोरणे, सवलती यांद्वारे उद्योगांना खुणावत आहेत. या परिस्थितीत आपल्याला पहिला क्रमांक टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहावे लागेल. उद्योग, पायाभूत सुविधांची भरभराट यांच्यासाठी राज्यातील कायदा व सुव्यवस्था, सामाजिक स्वास्थ्य, सौहार्द शाश्वत ठेवावे लागते. पुरोगामी महाराष्ट्राचे तेही बळच आहे. त्याला छेद देण्याचे प्रयत्न हाणून पाडत प्रगतीच्या चाकांची गती कशी वर्धिष्णू राहील, यावर सरकारने आणि सर्वच घटकांनी भर द्यायला हवा. आव्हाने, अडचणी, प्रतिकूलता यावर मात करून मार्गक्रमणातच पराक्रम असतो. या मराठी मातीत ती रग ओतप्रोत भरलेली आहे.

राज्यापुढे सध्या अनेक प्रश्न आहेत. स्थापनेपासून साडेतीन दशके ‘पुलोद’चा १८ महिन्यांचा अपवाद वगळता सलग काँग्रेसचीच सत्ता होती. त्यानंतर १९९५मध्ये प्रथमच राज्यात खऱ्या अर्थाने सत्तांतर झाले. शिवसेना-भाजप युती सत्तारूढ झाली. अर्थात, त्यानंतर पुन्हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीनेच तब्बल १५ वर्षे राज्यशकट चालवला. पुन्हा भाजप-शिवसेना युती सत्ताधारी बनली. मात्र, २०१९ मध्ये हातातोंडाशी आलेली सत्ता गेल्यापासून भाजप नेते अस्वस्थ झाले आहेत. सत्तांतर होऊन जवळजवळ निम्मा काळ पूर्ण झाल्यानंतरही त्याचे कवित्व कायम असणे हे महाराष्ट्रात प्रथमच घडताना दिसते आहे. लोकशाहीत विजय आणि पराभव पक्षांच्या वाट्याला येणे ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. ते सहजपणे स्वीकारण्यातच लोकशाहीचे मर्म दडलेले आहे. पण तसे न होता जी काही आदळआपट सुरू आहे आणि त्याला राज्यातील सत्ताधारीही जबाबदारीला न शोभणाऱ्या ज्या आक्रस्ताळेपणाने सामोरे जात आहेत, त्या सगळ्यामुळे राजकीय आणि पर्यायाने सामाजिक वातावरण गढूळ होत आहे. परस्पर बंधुभाव हे महाराष्ट्र धर्माचे वैशिष्ट्य आहे. ते गमावता कामा नये. त्यामुळेच खरी गरज आहे ती ‘महाराष्ट्र दिना’च्या निमित्ताने राज्याची आजवरची प्रगतिशील वाटचाल कायम राखण्याच्या संकल्पाची. राजकीय वर्गासह साऱ्यांनीच त्यासाठी निर्धाराने उभे राहायला हवे.

# राख झटका!

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात ऊर्जामंत्री आर के सिंग यांनी दिलेल्या इशाऱ्यावर ‘लोकसत्ता’ने ‘घोषणांची वीज, धोरणांचा प्रवाह’ (७ ऑक्टोबर २०२१) हे संपादकीय लिहिले. त्या वेळी आजच्यासारखी उष्णतेची लाट नव्हती की युक्रेन-रशिया युद्ध सुरू नव्हते आणि म्हणून इंधन संकटही नव्हते. तरीही सिंग यांचा इशारा दखलपात्र होता. तो होता देशातील औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांस कोळसाटंचाई भेडसावणार असल्याचा. त्या वेळी देशातील सर्व औष्णिक ऊर्जानिर्मिती केंद्रांत सरासरी फक्त चार दिवस पुरेल इतकाच कोळसासाठा होता आणि तातडीने उपाययोजना केली नाही तर या केंद्रांतील वीजनिर्मिती बंद पडेल अशी भीती खुद्द केंद्रीय ऊर्जा मंत्रिमहोदयांनाच वाटत होती. त्याचा संदर्भ आज देण्याची गरज म्हणजे देशासमोर पुन्हा निर्माण झालेली तशीच परिस्थिती. अवघ्या सात महिन्यांपूर्वी जे घडले तेच आज पुन्हा घडत असेल, तीच समस्या, तेच संकट भेडसावत असेल तर सदरहू खात्याच्या कार्यक्षमतेविषयी प्रश्न निर्माण करणे अपरिहार्य ठरते. आपले सर्व काही कार्यक्षम, धोरणी, अभूतपूर्व, ऐतिहासिक इत्यादी इत्यादी आहे असे विद्यमान सत्ताधीश आणि त्यांचे विचारशून्य अनुयायी यांस वाटत असले तरी ते फक्त त्यांचे ‘वाटणे’ आहे. वास्तव तसे नाही. संकटाची चाहूल लागत असतानाही, त्याबाबत इशारे दिले जात असतानाही सरकारने ऊर्जा क्षेत्राकडे सातत्याने दुर्लक्ष केले हे वास्तव आहे. त्याची सुरुवात होते विद्यमान सरकारच्या पहिल्या सत्तास्थापनेनंतर अवघ्या दोन वर्षांत. तत्कालीन कोळसा सचिव अनिल स्वरूप यांच्यासह अनेक ऊर्जातज्ज्ञांनी २०१६ साली ‘आ’ वासून समोर दिसत असलेल्या ऊर्जा क्षेत्राची गरज आणि कोळसा पुरवठा यातील तफावतीवर लक्ष वेधले. तथापि त्या वेळी देशात कोळशाचा साठा मुबलक होता. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष झाले. साठा मुबलक आणि भरपूर पुरवठा यामुळे देशांतर्गत खाणविस्ताराची गरज सरकारास नव्हती. परत मनमोहन सिंग सरकारच्या काळातल्या कथित कोळसा घोटाळ्याचा बागुलबुवा विद्यमान सत्ताधीशांनी इतका मोठा उभा केलेला होता की त्यामुळे ते स्वत:च बुजून गेले. प्रत्यक्षात दूरसंचार घोटाळ्याप्रमाणे कोळसा खाण घोटाळ्यातूनही काहीच निष्पन्न झाले नाही. हे बोफोर्ससारखेच म्हणायचे. नुसताच धुरळा. पण स्वत:च्या पायांनी उडवलेला हा धुरळा स्वत:च्याच डोळ्यात गेलेला असल्यामुळे समोरचे कोळसा संकट सरकारास दिसले नाही. दरम्यान, कोळसा खाणींची कंत्राटे रद्द झालेली. टंचाईचा विचार जे शहाणे असतात ते नेहमी बेगमी असतानाच करतात. गुदामे भरलेली आहेत म्हणजे उद्याची ददात मिटली असे मानून हातावर हात धरून बसल्यास नंतर पोटाला चार घास मिळायचे वांधे होतात. कोळशाबाबत आपल्याकडे हेच झाले.



कोळसा घोटाळ्याची आवई उठवण्यात आलेले यश, खासगी कंपन्यांस खनिकर्म खुले करणारा उत्तम निर्णय (याचे स्वागत ‘लोकसत्ता’ने १० जानेवारी २०२० रोजी ‘पुन्हा कोळसाच..!’ या संपादकीयातून केले होते.) आदींमुळे आपण कोळसा संकटावर मात केल्याचा भ्रम सरकारच्या मनात निर्माण झाला. बरे झाला तो झाला! पण त्यावर सरकारने केले काय? तर ‘कोल इंडिया लिमिटेड’ या सरकारी कंपनीच्या शेकडो अधिकाऱ्यांस देशभरात संडास उभारणीच्या कामांस जुंपले. म्हणजे ज्यांनी खनिकर्म योजना आखायच्या, नवनवी खाण क्षेत्रे धुंडाळायची, विविध औष्णिक वीज उत्पादकांशी चर्चा करून त्यांच्या आगामी काळातील कोळसा मागणीचा वेध घ्यायचा ते ‘कोल इंडिया’चे अधिकारी या काळात ‘स्वच्छ भारत’ अभियानात घाम गाळत होते. स्वच्छता हवीच. पण म्हणून जीवनावश्यक खाणी बिनमहत्त्वाच्या मानाव्यात वा त्याकडे दुर्लक्ष करावे असे नाही. आपल्याकडे नेमके तसेच झाले. परिणामस्वरूप ‘कोल इंडिया’च्या खाणी हळूहळू निर्जीव होत गेल्या. या महत्त्वाच्या कंपनीची आपण इतकी उपेक्षा केली की २०१७ साली ‘कोल इंडिया’चे व्यवस्थापकीय संचालक सुतीर्थ भट्टाचार्य निवृत्त झाल्यानंतर वर्षभर या कंपनीला प्रमुखच नव्हता. कनिष्ठ अधिकारी संडासबांधणीत मग्न आणि सर्वोच्च अधिकाऱ्याचे पद रिकामे! इतकेच नाही. तर या कंपनीच्या खजिन्यातील तब्बल ३५ हजार कोटी रुपयांतील लक्षणीय वाटा सरकारने स्वत:लाच लाभांश म्हणून घेतला. म्हणजे ज्याप्रमाणे ‘रिझर्व्ह बँके’कडून लाभांशरूपाने सरकार नियमित आपला हप्ता घेते त्याचप्रमाणे ‘कोल इंडिया’चा हक्काचा पैसा सरकारच्या वित्तीय तुटीचे खिडार बुजवण्यासाठी वापरला गेला.

या सर्वाचा दूरगामी परिणाम असा की कोळसा क्षेत्रात आपल्याकडे अलीकडे मोठी गुंतवणूक झालेली नाही. याच्या तांत्रिकतेत न जाता वास्तव सहज लक्षात येण्यासाठी मागणी आणि पुरवठा यांतील तफावत पुरेशी आहे. देशातील जवळपास पावणेदोनशे औष्णिक ऊर्जा केंद्रांस वीजनिर्मिती अखंड सुरू ठेवण्यासाठी दररोज साधारण २२ लाख टन कोळसा लागतो. प्रत्यक्षात तो या केंद्रांना मिळतो फक्त १६ लाख टन. याचा साधा अर्थ असा की गरजेपेक्षा पुरवठा एकचतुर्थांश इतका कमी असेल तर परिस्थिती गंभीरच होणार. आता यासाठी केंद्र सरकार स्वत: सोडून अन्य सर्वांस बोल लावत असले तरी शुद्ध तपशिलाधारित वास्तव हे आहे. याबाबत सरकारची निष्क्रियता समोर आणण्यात नि:संशय मोठा वाटा आहे तो सध्याच्या तपमानवाढीचा. पण त्याबाबतही हेच सरकार जगाने काय करायला हवे याचे इशारे देते. म्हणजे सरकारला या संकटाची पूर्ण कल्पना आहे. अशा वेळी तर या तपमानवाढीसाठी जास्त सजग असायला हवे. ते राहिले बाजूला. जे संकट येऊन ठाकले आहे त्याचे इशारे इतरांस द्यावयाचे आणि स्वत: त्याच संकटात सापडायचे अशी ही धोरणशिथिलता.

आणि हे कमी म्हणून की काय अमेरिका, चीन आदींच्या नादाला लागून आपणही विजेवर चालणाऱ्या गाड्यांबाबत मंत्रचळेपणा करू लागलो आहोत. हे एक नवीनच संकट. वास्तविक आताच सरत्या एप्रिल महिन्याने आपली विजेबाबत तोळामासा प्रकृती उघड केली आहे. आपली जवळपास ७० ते ७५ टक्के इतकी विजेची गरज ही औष्णिक मार्गाने भागवली जाते. गेल्या जवळपास दशकभरात आपल्याकडे ना जलविद्युतनिर्मिती वाढली ना आपण आण्विक ऊर्जानिर्मिती वाढवू शकलो. जलविद्युत वाढू शकत नाही कारण धरणे बांधण्यावर मर्यादा आणि अणुऊर्जा वाढली नाही कारण अमेरिकेबरोबरच्या करारानंतरचे सोपस्कार आपण आजतागायत पूर्ण करू शकलो नसल्याने समृद्ध युरेनियमचा पुरवठा आपणास होऊ शकत नाही. म्हणजे सारा भर आहे तो कोळसा जाळून तयार करावयाच्या विजेवर. त्यात परत आपला नन्नाचा पाढा असा की आपल्या कोळशाचा ज्वलनांक समाधानकारक नसल्याने त्यातून राख जास्त निर्माण होते आणि परत खाण क्षेत्राकडेही आपले वर उल्लेखलेले दुर्लक्ष. त्यामुळे ऑस्ट्रेलिया वा इंडोनेशिया यांच्याकडून आपणास कोळसा आयात करावा लागतो.

जागतिक तपमानवाढीच्या काळात या साऱ्याचा अंदाज बांधून आधीपासूनच तयारी करणे आवश्यक होते. ते झाले नाही. आता गळ्याशी आल्यावर प्रवासी रेल्वे गाड्या रद्द करून मालगाड्यांतून कोळसा पुरवठा हाती घेण्याची वेळ सरकारवर आली. हे सहज टाळता येण्याजोगे होते. करोनाप्रमाणे या संकटाची चाहूल राहुल गांधी यांना आधी लागून ते इशारा देतात आणि केंद्रातील उच्चपदस्थ व अभ्यासू आदी नेतृत्वास ते कळू नये हे आश्चर्यच म्हणायचे. ऊर्जा जाणिवांबाबत सरकारने आपल्या समजशक्तीवरची राख जरा झटकायला हवी, हेच यातून पुन्हा एकदा दिसते.

## पुण्यातील सिंहगड कॉलेजमध्ये गुंडांचा राडा; विद्यार्थ्याला बेदम मारहाण




पुणे - स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी पुण्यातील नामांकित कॉलेजमध्ये 10 ते 11 जणांच्या टोळक्याने एका विद्यार्थ्याला कॉलेज परिसरात लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आंबेगाव खुर्द येथील सिंहगड कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स या कॉलेजमध्ये शुक्रवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली असून, भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सराईत गुन्हेगारांवर गुन्हा दाखल - या प्रकरणी सराईत गुन्हेगार विकास उर्फ विकी चावडा याच्यासह मोहन राठोड, चेतन थोरे, साहिल गायकवाड यांच्यासह सहा अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अथर्व दीपक चौधरी याने याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे.काय आहे प्रकरण - या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार विकास उर्फ विकी चावडा याने तक्रारदार अथर्व चौधरी याला फोन करून कॉलेजमध्ये बोलावून घेतले. त्यानंतर त्याला दमदाटी करत 'तू माझे ऐकत नाही का? मी भाई आहे या कॉलेजचा' असे म्हणत मारहाण केली. नंतर अथर्वला दुचाकीवर बसवून "थांब तुला जीवे मारून टाकतो, तू माझे ऐकत नाही का? असे म्हणून कॉलेजच्या पार्किंगमधून त्याला बाहेर नेले आणि "मी भाई आहे इकडचा" असे म्हणत लाकडी बांबू व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. भारती विद्यापीठ पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणाच्या हत्येचा उलगडा; मोबाइलवर बोलण्याच्या वादातून मित्रानेच डोक्यात दगड टाकून हत्या केल्याचे उघडकीस

ठाणे - निर्जनस्थळ असलेल्या मोकळ्या जागेत एका 28 वर्षीय तरुणाची डोक्यात दगड टाकून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना 25 एप्रिलला बदलापुरात घडली होती. या निर्घृण हत्येचा धक्कादायक प्रकार पोलीस तपासात समोर आला आहे. मोबाइलवरून जास्तवेळ बोलण्याच्या वादातून एका मित्राने दुसऱ्या मित्राच्या डोक्यात दगड टाकून हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. समसूल हक गुलाम करीम, असे अटक आरोपी मित्राचे नाव आहे. तर प्रसाद जिंजुरके, असे निर्घृण हत्या झालेल्या मित्राचे नाव आहे. दारूची पार्टी करण्याच्या बाहण्याने नेऊन हत्या - मृत प्रसाद हा बदलापूर पूर्वेकडील सापेगाव परिसरात असलेल्या पोतदार सोसायटीत कुटूंबासह राहत होता. त्याच सोसायटीमध्ये आरोपी समसूलही पत्नी व दोन मुलासह राहतो. त्यामुळे दोघांची मैत्री होती आणि दोघेही पेंटरची कामे करत होते. त्यातच (दि. 24 एप्रिल ) रविवारी आरोपी मित्राच्या मोबाइलवरून मृत प्रसाद बराच वेळ बोलत होता. त्यावेळी आरोपीने त्याला माझ्या मोबाइलवरून बोलू जास्त नकोस म्हणून वाद घातला. त्यानंतर मृत प्रसादला दारूची पार्टी करण्याच्या बाहण्याने रविवारी रात्रीच्या सुमारास सोबत नेले.



त्यानंतर आरोपी समसूलने प्रसाद डोक्यात दगड घालून त्याची हत्या करून फरार झाला.हत्या करून आरोपी पळाला होता आंध्रप्रदेशला - दरम्यान, सोमवारी (दि. 25 एप्रिल) रोजी दुपारच्या सुमारास जुवेलीकडून चामटोली गावाकडे जाणाऱ्या पुलाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या मैदानात प्रसादचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच बदलापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगरमधील शासकीय रुग्णालयात रवाना केला. याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला. पोलिसांचा तपास सुरू असतानाच गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, घटनेच्या रात्री दोघे मित्र सोसायटीमधून सोबत गेले. त्यानंतर आरोपी तेव्हापासून बेपत्ता असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाचे चक्र वेगाने फिरवत आरोपीचा ठावठिकाण शोधून काढला असता आरोपी आंध्रप्रदेशमध्ये असल्याचे समजले. 72 तासात आरोपी गजाआड - त्यानंतर बदलापूर पोलिसांचे पथक आंध्रप्रदेशला रवाना झाले. मात्र, पोलीस पथक आंध्रप्रदेशला पोहोचल्यानंतर आरोपी पुन्हा कल्याणच्या दिशेने येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस पथकही आंध्रप्रदेशमधून तातडीने कल्याणाला रवाना होत आरोपीला कल्याण रेल्वे स्थानक परिसरातून 72 तासाच्या आत अटक केली आहे.

## प्रेम प्रकरणातून सुरु असलेला वाद सोडवण्यासाठी 'तो' गेला आणि पुढे घडले ते धक्कादायकच

पुणे, लोकमान्यनगरच्या पोस्ट ऑफीसजवळ प्रेमप्रकरणातून सुरू असलेला वाद सोडविण्यासाठी गेलेल्या तरुणावर प्रेयसीच्या मामाने तलवारीने वार करून खून केल्याची घटना शुक्रवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास घडली. याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.



प्रसाद उर्फ गणेश रवींद्र गायकवाड (वय २१, रा. गणेशमळा) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी तरुणीचा मामा तुकाराम मारुती दारवटकर (वय ४१, रा. खैरेवाडी, गणेशखिंड रस्ता) याला अटक करण्यात आली आहे. तर, माउली मारुती दारवटकर (वय ४१, रा. खैरेवाडी, गणेशखिंड रस्ता), पौर्णिमा रविंद्र भरगुडे (वय २२, रा. लोकमान्य नगर) यांच्यासह पाच ते सहा जणाविरुद्ध विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी राहुल शांताराम वाळज (वय २२, रा.भुकुम) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार राहुल याचा कपड्याचा व्यवसाय आहे. तो व त्याचा मित्र शुक्रवारी रात्री लोकमान्यनगर येथून जात होते. त्यावेळी त्याला त्याची प्रेयसी ती काम करत असलेल्या दुकानाच्या व्यवस्थापकासोबत दुचाकीवरून जाताना दिसली. त्यामुळे त्याने व मित्राने व्यवस्थापकाला थांबवून दोघात काय सुरू आहे का, अशी विचारणा केली. त्यावरून व्यवस्थापक व राहुल वाळज यांच्यात वाद सुरू झाले. त्यावेळी राहूलच्या प्रेयसीने तिचे मामा तुकाराम व माउली दारवटकर यांना बोलवून घेतले. दारवटकर व आणखी पाच ते सहाजण त्या ठिकाणी आले. त्यांनी तक्रारदार व त्यांचा मित्र राज पवार यांना शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी तक्रारदार यांचा मावसभाऊ रोहित मुळे व त्याचा मित्र गणेश गायकवाड तेथून जात होते. त्यांनी हा प्रकार पाहिला. ते दोघे भांडणे सोडविण्यासाठी आले.

# उद्योजक व्हा, रोजगार वाढवा- महाराष्ट्रदिनी केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणेंचे आवाहन

## महाराष्ट्रदिनी `महाराष्ट्र एमएसएमई एक्सपो 2022'चे केंद्रीय लघु मध्यम उद्योगमंत्री नारायण राणेंच्या हस्ते उदघाटन











मुंबई- 'उद्योजक व्हा, रोजगार वाढवा', असे समस्त महाराष्ट्रीयजनांना आवाहन करत केंद्रीय लघू मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांनी वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे `महाराष्ट्र एमएसएमई एक्सपो २०२२' या तीन दिवसीय व्यावसायिक प्रदर्शनाचे उदघाटन केले. यावेळी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अध्यक्ष विजय कलंत्री, कार्यकारी संचालिका रूपा नाईक, एमएसएमई महाराष्ट्रचे संचालक प्रशांत पार्लेवार, दुबईस्थित पेशवा हॉटेलचे व्यवस्थापकीय संचालक सचिन जोशी, झेप उद्योगिनीच्या संस्थापिका पूर्णिमा शिरीषकर आदी मान्यवर उपस्थित होते. सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मंत्रालय आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग विकास संस्था, "झेप उद्योगिनी" आणि "वी एमएसएमई" च्या सहकार्याने १ मे ते ३ मे दरम्यान हे प्रदर्शन आयोजित केले आहे."भारताच्या एकूण आर्थिक उलाढालीत मुंबईचा वाटा ३४ टक्के आहे. अन्य राज्यातील तसेच परदेशी उद्योजकांचा यामध्ये महत्वाचा वाटा आहे. मुंबई तुमचीच आहे, मात्र मुंबईत तुम्ही कुठे आहात असा सवाल करत केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी महाराष्ट्रीयजनांना 'उद्योजक व्हा, रोजगार वाढवा' असे आवाहन केले. मी महाराष्ट्राचा उद्योगमंत्री होतो. त्यावेळी महाराष्ट्रात उद्योग-व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रात लघु- मध्यम उद्योग खात्याची जबाबदारी देताना सांगितले होते की आपल्या देशात रोजगार निर्मितीवर भर द्या. भारताला आत्मनिर्भर बनविणे हे पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे, असे नारायण राणे म्हणाले. यावेळी एमएसएमई महाराष्ट्रचे संचालक प्रशांत पार्लेवार यांनी एमएसएमई एक्स्पो- २०२२ आयोजित करण्यामागची संकल्पना स्पष्ट करताना सांगितले की, विविध शासकीय योजना उद्योजकांना कळाव्यात. महिलांनी उद्योजिका म्हणून सक्षम व्हावं यासाठी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकार हे महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांचे मार्केटींग करणार आहे. बीकेसी येथे प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन केंद्र तयार करण्यासाठी १५०० कोटी रुप यांचा प्रकल्प प्रस्तावाधीन आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या कार्यकारी संचालिका रूपा नाईक यांनी महिला सक्षमीकरणावर भर देताना सांगितले की, मुलीने शिक्षण घेऊन सक्षम होणं आवश्यक आहे. पुरुषांनी उद्योजक स्त्रियांपाठी खंबीरपणे उभं राहणं आवश्यक आहे. एमएसएमई विभागाने त्यांच्या विविध समित्यांवर महिला उद्योजिका सदस्यांची नियुक्ती करावी, अशी विनंती रुपा नाईक यांनी यावेळी उद्योगमंत्र्यांना केली.एक हजार महिला उद्योजिका आतापर्यंत झेप उद्योगिनीच्या माध्यमातून घडल्या भविष्यात हा आकडा आणखी वाढेल, असा शब्द केंद्रीय उद्योगमंत्र्यांना देत कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन झेप उद्योगिनीच्या संस्थापिका पूर्णिमा शिरीषकर यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण खोत यांनी केले. याप्रसंगी केंद्रीय लघू मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते 'महाराष्ट्र एमएसएमई अचिव्हर्स' या नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रदर्शनाच्या माध्यमातून अनेक उद्योजकांना नवीन व्यावसायिक संधी, सरकारसोबत व्यवसाय करण्याची संधी प्राप्त होणार आहे. लघु-मध्यम उद्योग योजना, कॉर्पोरेट कंपन्यांसोबत व्हेन्डर्स डेव्हलपमेंट प्रोग्राम, मुद्रा कर्ज योजना, परदेशातील व्यावसायिक संधी, आयात-निर्यात या विषयावर मार्गदर्शन देखील मिळणार आहे. या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून अनेक उद्योजक आपल्या व्यवसायाचे प्रदर्शन करणार आहेत. थेट उत्पादकांसोबत संवाद साधण्याची संधी या प्रदर्शनाद्वारे उपलब्ध होणार आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्राची कला आणि संस्कृतीचे सादरीकरण करणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प शामसुंदर सोन्नर महाराज यांच्या पंढरीच्या वारीने झाली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आपल्या शाहिरीने गाजविणारे शाहीर अमरशेख यांचे नातू निशांत जैनू शेख यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली' ही छक्कड सादर केली. पैठणी नेसून केला जाणारा रॅम्प वॉक हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य ठरले. यावेळी काही यशस्वी उद्योजकांचा सन्मान देखील करण्यात आला.

## अत्याचार, खून प्रकरण : आरोपीस मरेपर्यंत कारावासाची शिक्षा



कोल्हापूर - हातकणंगले तालुक्यातील खोची येथील अल्पवयीन मुलीचा अत्याचार करून खून केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी आरोपी बंडा उर्फ प्रदीप पोवार ( वय 30 वर्षे, रा. खोची, ता. हातकणंगले ) यास दोषी ठरवत आरोपीला मरेपर्यंत कारावासाची शिक्षा कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश वृषाली व्ही. जोशी यांनी सुनावली आहे. अपहरण, अत्याचार, हत्या - हातकणंगले येथील खोची येथे दिनांक 31 ऑक्टोबर, 2021 रोजी एका अल्पवयीन मुलीला तिच्या राहत्या घरातून अपहरण करून तिच्यावर अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या करून केल्याची घटना घडली होती. तर पीडित मुलीचा मृतदेह त्याचदिवशी सायकांळी गावालगतच्या मुस्लिम समाजाच्या दफनभूमीच्या कंपाउंडमध्ये एका झाडाखाली आढळून आले होते. या घटनेने कोल्हापूर जिल्ह्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणी तपासी अधिकारी म्हणून पेठवडगाव पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी महत्त्वाची भूमिका बजावत काही तासातच आरोपी प्रदीप उर्फ बंडा पोवार यास जेरबंद केले. अवघ्या 31 दिवसात पोलिसांनी तपास पूर्ण करून संशयीता विरूध्द 225 पानी दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले होते.मरेपर्यंत कारावासाची शिक्षा - या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उमेशचंद्र यादव-पाटील यांची नियुक्ती करण्यात आली होती. 22 मार्चपासून सुनावणीला सुरुवात झाली आणि सरकार पक्षातर्फे एकूण 28 साक्षीदार तपासून मरणोत्तर तपासणी अहवाल, शवविच्छेदन अहवाल, घटनास्थळ पंचनामा, आरोपी आणि पीडित बालिका यांच्या कपड्यांचे पंचनामे, घरझडती पंचनामा,आरोपीने पंचनाम्यादरम्यान काढून दिलेले घटनेच्यावेळी वापरलेले रक्तलांछित कपडे, चप्पल, फोरेन्सिक प्रयोगशाळेचे अहवाल, घटनास्थळ आणि इतर पंचनाम्याचे फोटो, आरोपी व पीडित बालिका यांना घटनेच्या अगोदर पाहिलेले प्रत्यक्षदर्शी, साक्षीदार, अशी भक्कम पुराव्याची साखळी न्यायालयासमोर सादर करण्यात आली. आरोपी बंडा उर्फ प्रदीप पोवार यास फाशीच्या मागणी सरकारी पक्षाकडून करण्यात आली होती. मात्र, प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश वृषाली व्ही. जोशी यांनी आरोपी पोवार याला दोषी ठरवत मरेपर्यंत कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

## नांदेडमध्ये गोळी झाडून केला तलवारीने हल्ला; एक जण जखमी

नांदेड: बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांच्या हत्येनंतर नांदेड शहरात पोलीस दल गुन्हेगारांची धरपकड करुन त्यांच्याकडून अवैध शस्त्र जप्त करत असताना शनिवारी दुपारी जवाहरनगर तुप्पा येथे गोळीबारीची घटना उघडकीस आली. हल्लेखोराकडून गोळीचा नेम चुकल्याने तलवारीच्या साहाय्याने युवकाला जखमी करून हल्लेखोर पसार झाला..



नांदेड शहरात व जिल्ह्यात अवैध बंदुका, तलवारी, खंजीर जप्त करून गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी पोलीस परिश्रम घेत असताना आज शनिवारी पुन्हा एकदा शहरात गोळीबाराची घटना घडली आहे. प्राप्त माहितीनुसार, शनिवारी जवाहरनगर तुप्पा भागात दिलीप पुंडलिकराव डाखोरे रा. शंभरगाव ता.लोहा याने पिंटु कसबे या युवकावर क्षुल्लक कारणावरुन गावठी पिस्तूलातून गोळी झाडली. मात्र या हल्ल्यात डाखोरेचा नेम चुकला तेंव्हा डाखोरेने पुन्हा जवळच्या तलवारीच्या साहाय्याने पिंटु कसबेच्या पायावर वार करून त्याला जखमी केले आणि तो पसार झाला. दिलीप डाखोरे हा एका प्रमुख गँगचा एक सदस्य आहे.गोळीचा नेम चुकला तरी त्याने तलवारीच्या साहाय्याने युवकावर हल्ला करून जखमी केले. घटनेची माहिती मिळताच इतवाराचे पोलीस उपअधिक्षक डॉ.सिध्देश्वर भोरे, पोलीस निरिक्षक अशोक घोरबांड घटनास्थळी पोहचले. या प्रकरणाचा तपास सुरु असून जखमी पिंटू कसबेवर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## सोनसाखळी चोराला लोहमार्ग पोलिसांनी केली अटक

मुंबई - तब्बल दोन वर्षांनंतर कोरोनाचे सर्व निर्बंध हटविण्यात आले आहे. परिणामी पुन्हा लोकलमध्ये गर्दी वाढू लागली आहे. याच गर्दीचा फायदा घेत चोरी करणाऱ्यांची संख्या देखील वाढलेली आहे. मोबाईल, मौल्यवान वस्तूची चोरी होण्याची प्रकरणे वाढली जात आहे. नुकताच एक प्रवासी बेसावधपणे प्रवास करत असताना साखळी चोरी करण्याची घटना घडली.



मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिसांची कारवाई - पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी 10.30 च्या सुमारास पश्चिम रेल्वेच्या दादर फलाट 3 वर विरार-चर्चगेट लोकल आली असता, लोकलमध्ये बसलेल्या प्रवाशाच्या गळ्यातील सोनसाखळी जबरदस्तीने गळातून खेचून चोराने पळ काढला. प्रवाशाने यासंदर्भात मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी चोराचा शोध घेण्यास सुरुवात केली. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने चोराचा मागोवा घेण्यात आला. पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून पाच दिवसात चोराला अटक केली. या घटनेतून या चोराकडून 20 ग्रॅम वजनाची सोनसाखळी तपासदरम्यान जप्त केली आहे. तर, आरोपीची चौकशी करण्यात येत आहे आहेत.

पोलिसांची डोकेदुखी वाढली - मुंबई आणि उपनगरील वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वेचा उपनगरी रेल्वे प्रवास अत्यंत जिकरीचा झाला आहे. काही वर्षांत लोकलमधील प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्यामुळे लोकलच्या डब्यातील प्रवास म्हणजे तारेवरची कसरत ठरत आहे. या गर्दीचा फायदा घेईन मोबाईल, मौल्यवान वस्तूची चोरी होण्याची प्रकरणे वाढली आहे. त्यामुळे पोलिसांची सुद्धा डोकेदुखीत वाढ झाली आहे. या चोरट्यांना आळा घालण्यासाठी रेल्वे स्थानकांवर पोलीस गस्त वाढविण्यात येत आहेत.

## कर्ज फेडले नाही, 'त्याने' नातेवाईकांच्या मोबाइल पाठवल्या पॉर्न क्लिक

मुंबई : नातेवाईकांच्या मोबाइलवर आपल्या पॉर्न क्लिक आल्याने एका व्यक्तिला धक्काच बसला. एक दोन जणांना नव्हे तर जवळपास १२ नातेवाईकांना आणि मित्रांना या पॉर्न क्लिक आल्या. यामुळे ३३ वर्षीय व्यक्ती हादरली आणि तिने थेट पोलीस स्टेशनच गाठले. ही पॉर्न क्लिक मॉर्फ केल्याचं प्राथमिक चौकशीत लक्षात आलं. विशेष म्हणजे ज्या कंपनीकडून कर्ज घेतले होते, त्या कंपन्याच्या एक्झिक्युटिव्हने ही पॉर्न क्लिक मॉर्फ करून नातेवाईकांना पाठवल्याचं तपासात स्पष्ट झालं. या प्रकरणी कंपनीच्या एक्झिक्युटिव्ह विरोधात एफआयआर दाखल करण्यात आली. आता पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

आरोपीने तीन पॉर्न फोटो मॉर्फ केले होते. हे फोटो जवळपास १२ नातेवाईक आणि मित्रांना पाठवल्या. यातील ४ जण महिला आहेत. या प्रकरणात अप्रत्यपक्षने महिला पीडित ठरल्या. यामुळे या प्रकरणी लैंगिक छळ केल्याचा गुन्ह दाखल केला आहे. तसंच माहिती तंत्रज्ञान अंतर्गतही एफआयआर नोंदवण्यात आला आहे, अशी माहिती जीआरपीच्या मुंबई सेंट्रल येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक केदारी पवार यांनी दिली. गुरुवारी एफआयआर दाखल झाला.



गेल्या नोव्हेंबरमध्ये पीडित व्यक्तीने डिजिटल कर्ज देणाऱ्या एका कंपनीकडून ॲपद्वारे कर्ज घेतलं घेतलं होतं. ७ हजार रुपयांचं त्याने कर्ज घेतलं होतं. सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्याने हे ७ हजारांचं कर्ज घेतलं. यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि फोटोही दिले होते. फार विलंब न करता पीडित व्यक्तीला कर्जही मिळालं. पण दिलेल्या कालावधीत हे ७००० रुपयांचं कर्ज आणि त्यावरील व्याज पीडित व्यक्ती फेडू शकला नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली. ॲपच्या माध्यमातून एक्झिक्युटिव्हने कर्ज फेडण्यासाठी तक्रारदारवर सतत दबाव आणला. पण आपण कर्ज फेडण्यास सक्षम नसल्याचं तक्रारदारने सांगितलं. पण तगादा लागल्यावर तक्रारदाराने फोन बंद करून ठेवला. यानंतर गेल्या महिन्यात तक्रारदाराच्या नातेवाईकांना आणि मित्रांना अज्ञात मोबाइल नंबरवरून पॉर्न क्लिक पाठवल्या गेल्या. यामुळे त्याला पोलिसांकडे धाव घ्यावी लागली. पीडित व्यक्तीने तक्रार करण्यासाठी वसई-विरार पोलीस ठाणे गाठले. पण कर्जची प्रक्रिया मुंबई दादर येथे झाल्याने त्यांना दादर येथील जीआरपीच्या पोलीस ठाण्यात तक्रार करण्यास सांगण्यास आलं. कर्ज वसुली प्रकरणी अंधेरी जीआरपी पोलिसांनी या आठवड्याच्या सुरवातीला एका अल्पवयीन मुलाला अटक केली होती. त्याने एका महिलेचा फोटो मॉर्फ केला होता. तो कर्नाटकचा होता. ऑनलाइन कर्ज फेडण्याची क्षमता नसल्यामुळे तिच्या नातेवाईकांना पॉर्न व्हिडिओ पाठवण्यात आले. अश्लील व्हिडिओंचा भडिमार केला. 'सेक्स वर्कर'शी संपर्क साधा, असा मेसेजही पाठवला. पोलिसांनी या प्रकरणी तपास केला. आणि १९ वर्षीय पुतण्याला अटक केली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898